12/7

15-6-1989

प्रकल्पबाधित व्यक्तिंना पर्यायी गावठाणातील भूखंडावर घर बांधण्याकरता कर्ज देण्यासंबंधीची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र.आरपीओ.१०८६-सीआर.३९३१-र-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. १५ जून १९८९.

पहा : शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.आरपीओ.१०८६-सीआर.३९३१-र-१ दिनांक २७-३-१९८७.

निर्णय :

राज्य शासनातर्फे हाती घेण्यात येणाऱ्या विविध पाटबंधारे आणि इतर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींना पुनर्वसित गावठाणात घर बांधण्यासाठी कर्ज देण्याची योजना महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येते. या योजनेनुसार पुनर्वसित गावठाणात प्रकल्पग्रस्ताला घर बांधण्यासाठी दिलेला भूखंड आणि त्यावर बांधावयाचे घर यांचे तारणावर जर सदर प्रकल्पग्रस्त व्यक्ती खातेदार असला तर रु.८,०००-०० आणि बिगर खातेदार असला तर रु.४,०००-०० याप्रमाणे कर्ज तीन हप्त्यात देण्यात येते. हे कर्जाचे हप्ते प्रकल्पग्रस्ताला रोखीच्या स्वरुपात देण्यात येतात. या संदर्भात कर्जाची रक्कम पूर्णतः मिळाली नाही अशा प्रकारच्या तक्रारींना वाव राहू नये म्हणून शासन असे आदेश देत आहे की, प्रकल्पबाधित कर्जदाराला घरबांधणी कर्जाच्या हप्त्यांची रक्कम यापुढे रोखीने न देता ती धनादेशाद्वारे किंवा ड्राफ्टद्वारे देण्यात यावी आणि हे धनादेश त्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी जसे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका इत्यादींच्या लोकप्रतिनिधींच्या समक्ष देण्यात यावे.

२. हा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर.५८९-८९-व्यय-१०, दिनांक २-५-८९ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही : बा.ग.जोशी.
अवर सचिव.

प्रति :

सर्व जिल्हाधिकारी.
सर्व उपविभागीय अधिकारी.
सर्व तहसीलदार

००००००

क्र.मेशी.ठेवस.२.आरपीओ.६०१.

जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी, दि. ७ जुलै १९८९.

प्रत :

तहसीलदार (सर्व), उपविभागीय अधिकारी (सर्व) यांजकडे माहितीसाठी रवाना. रत्नागिरी

जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता.